
संदर्भ
काव्य
१५३३

९९६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५३३




REFBK-0011245
REFBK-0011245

—प्रताप

# गीत - वेणु

(भावगीत संग्रह)

— प्रताप

किंमत ७५ नये पैसे.

सर्व अधिकार लेखकाधीन–

प्रकाशिका :–

**सौ. कृष्णाताई गोपाल जमदाडे**
'प्रताप साहित्य प्रकाशन'
दुधोंडी (द.सातारा)

मुद्रक :–

एस्. डी. कत्ते
**नव–महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस,**
सांगली ( द. सातारा )

प्रमुख विक्रेते:–

**'जनरल स्टोअर्स'**
पलूस ( द. सातारा )

**प्रथमावृत्ति : १०००**

**दि. २० ऑगस्ट १९६०**

[stamp] ... ग्रंथालय ... 31545 दि: ... क्रमांक 9533 नों: दि: 25/11/...

आलापापूर्वी

‘ असा धरी छंद . . जाय तुटोनिया भवबंध!’

– संत तुकाराम

गेल्या मकर-संक्रांतीपासून पुढें एक महिनाभर भवबंध तुटल्याप्रमाणेंच मला माझ्या छंदानें वेडें करून टाकलें होतें! या वेडांत झालेल्या अेकतीस गीतांत जुन्या नऊ गीतांची भर घालून हा छोटासा भावगीत संग्रह आज सादर करतांना मला समाधान वाटत आहे. कविमित्र ‘ सुधांशु ’ यांच्या ‘ गीत सुगंधानें ’ माझ्या वेडास चालना मिळाली; हे नमूद करण्यास मला आनंद वाटतों.

‘ अुत्कट भावनांचा सहजस्फूर्त लयबद्ध अुद्रेक म्हणजे भावगीत ’ या भावगीताच्या निकषावर घासून पाहिल्यास कितीं भावगीतें टिकूं शकतील ? भाव आहे पण त्यांत गीत नाहीं; आणि गीत आहें पण भाव नाहीं अशीं कितीं तरी भावगीतें ( ! ) भाव खातांना दिसतात. ठराविक ठेकेदारी आणि वतनदारी यामुळें नामवंत कविसुद्धां केवळ पद्याची पैदास करूं लागतो; याचा खेद वाटतों.

रेडिओवर काव्यगायन करणाऱ्या कलावंतांना छुटछुटित भावगीतें लागतात हीं दृष्टि ठेवूनच माझी रचना झाली आहे. “ तुमचीं गीतें सुरेख झालीं आहेत. त्यांच्या आस्वादाचे क्षण म्हणजे सोनेरी कण वाटलें मला ! रेडिओस तीं जरूर पाठवा. ” कवि गिरीश यांच्या पत्रांतील हीं वाक्यें वाचून ‘ ब्रह्मगांठ ’ या माझ्या नाटकाचा प्रकाशन-क्रम आधींचा असतांना हा गीतसंग्रहच पुढें सरकला आहे.

अितिहास–पुराण कालांत अनेक महामानव होअून गेले आहेत. हृदय हेलावून सोडणारे अनेक अुत्कट प्रसंग त्यांच्या जीवनांत घडले आहेत. त्यांच्या स्मरणानें हृदय भरून येतें! अशा प्रसंगापैकीं थोडे प्रसंग – कीं ज्यांच्यावर कुणी फारशी लेखणी फिरविली नाहीं - तेच मी सामान्यत: निवडले आहेत. या कामीं अनेकांचें मला सहाय्य लाभलें आहे. चोखंदळपणानें कांहीं बदल सुचविणारे श्री. शंकरराव पाटील, संदर्भ ग्रंथांची खैरात करणारे श्री. आनंदराव चौगुले, “ गुरुजी, गीत अस्सं झालं पाहिजे–! ” असा सतत लकडा

लावणारे श्री. लक्ष्मणराव चव्हाण या पलूसच्या माझ्या सुहृदांचा मी अत्यंत ऋणी आहे. कवि सुधांशु यांनीं त्र संग्रहाचें ' नांव ठेवलं ' आहे! त्यांचे आभार मानणें त्यांना आवडणार नाहीं.


विख्यात कलावंत श्री. श्रीपाद नार्वेकर यांना विनंती करतांच आपली अितर कामें बाजूला सारून सुंदर व समर्पक चित्र तयार करून मुखपृष्ठ सजविलें. त्याचप्रमाणें तत्परतेनें सुबक छपाई करणारे श्री. श्रीपाल कत्ते, मुद्रण-प्रत तयार करणारा विद्यार्थी कुमार पांडुरंग मुळ्ये व आस्थेवाअिक रसिक मित्र प्रा. जगन्नाथ जोशी यांना धन्यवाद द्यावेत तेवढें थोडेंच होतील,

माझा हा अल्पसा नम्र प्रयत्न मराठी रसिकांना, गायक--गायिकांना आणि सर्व सामान्य जनांस आवडो हीच अपेक्षा.

लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यामंदीर
पलूस (द. सातारा)
दिनांक २० जुलै १९६०

**—प्रताप**

गांवच्या सार्वजनिक सेवेंत गेलीं दोन तपें चंदनाप्रमाणें झिजणारे
दुधोंडी मराठी शाळेचे
मुख्याध्यापक



**दे. भ. बाबुराव रावजी नलवडे**

यांना सादर अर्पण !

-०-

# -० प्रताप साहित्य ०-

प्रकाशित :-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | सुगन्ध-वारा | ( खंडकाव्य ) | २ रुपये |
| (२) | वसुन्धरा | ( कविता-संग्रह ) | २ रुपये |
| (३) | गीत-वेणु | ( भावगीत-संग्रह ) | ७५ नये पैसे |

आगामी-

| | | |
|---|---|---|
| (१) | ब्रह्मगांठ | ( सामाजिक नाटक ) |
| (२) | ? ? ? | (संपादित स्त्री-गीतें) |

卐


- गोपाल लक्ष्मण जमदाडे M.A.B.T. -
'प्रताप साहित्य प्रकाशन '
दुधोंडी- ( द. सातारा )

# —: नवलाचें पांखरू :—

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. ..........

बाअि ग नवलाचें पांखरू
मुलखाचें हें अगदीं बुजरें कसें याजला धरूं ? ॥ धृ. ॥

रूपडें गोजिरें मदनाचा कीं कुमर
नजरेला देअी मोहक गहिरी नजर
रोमांचित मी जातां पुढती . . लागें मागें सरूं !

मज साद घालितें पुष्पतरुवर बसुनी
नित गिरक्या मारित येतें मम अंगणीं
फुलारतें मन जातां जवळीं . . भुरकन गांठी तरू!

कोणत्या खुबीनें जाळें टाकूं तरी
जाळचांत अडकलें मीच मोहुनी पुरी
गांठ रेशमी याच्या पायीं . . बसे न कैसें करूं?

---

१७-१-६० :

# आल्यें तुझिया दारीं ——

( **कथासूत्र**– कान्होपात्रा ही वेश्येची मुलगी. आओनें तिला वेश्या करायचें ठरविलें, पण तिला तें पसंत नव्हतें. यवन सरदाराच्या तावडींतून सुटून तिनें पंढरपूर येथें देह ठेविला. घायाळ स्थितींत ती विठ्ठलाच्या राउळांत ' मला वाचव ! ' अशी विनंती करीत आहे– )

-०- -:- -०-

मी आल्यें तुझिया दारीं
विठू रे, तारी वा मारी ! ॥ धृ. ॥

कशि म्हणूं आअिला आओ ?
तिजहुनी दयार्द्र कसाओ
धन-लोभें लोटिते कर्दमीं विषयाच्या .. अुद्धरीं !

लागला यवन पाठीशीं
मी आल्यें रे तुजपाशीं
तुला वाहिलें तन मन माझें तूंच मला सांवरी !

जरि हीन कुळींतिल पोर
आजन्म तुझाच विचार
भक्तीमाजी अुच्चनीचता नाहीं प्रभु-अंतरीं !

हा देह तुझ्या चरणांशीं
मी अभ्रष्ट तुझिया कुसीं
कान्होपात्रा विनवी प्रभु रे, ठाव देअि सत्वरी !

१७–१–६० :

# दान मला द्या सौभाग्याचें !

( **कथासूत्र**– सत्यवानाचे प्राण घेऊन यमधर्म निघाला असतांना सति सावित्री त्याची पाठ सोडीत नाही. ' मुली, तूं आतां मागें फीर ' असें यमधर्मानें म्हटल्यावर सावित्री त्याला विचारते– )

° ° °

मी पाउल कोठें वळवायाचें
जिकडे पतिचें तिकडे सतिचें ! ॥धृ. ॥

" फिर माघारी " कैसें म्हणतां ?
कलिजा माझा घेउन जातां
कपाळ फुटतां व्यर्थ जीवनीं . . काय राहिलें मोल कुडीचें ?

ज्ञात असुनि मम दशा दारुणा
अल्पायुषि मी वरिला राणा
सत्यवान - रक्षणीं लागले . . प्राण पणाला सावित्रीचे !

पूर्ण करावा वर जो दिधला
कुणी बुधें का शब्द सांडिला ?
सदय यमाधिप, फांस सोडुनी ... दान मला द्या सौभाग्याचें!

१८–१–६०:

# -: भाग्य केवढें :-

( **कथासूत्र**– आबाजी सोनदेव यानें कल्याणच्या खजिना- लुटींत तेथील सुभेदाराची अतिशय रूपवान सूनहि पकडून आणून शिवाजीस नजर केली. त्यानें तिची बहिणीप्रमाणें संभावना केली. त्यावेळीं त्या यवनी स्त्रीस जो आनंद झाला तो तिच्या मुखानें–– )

० ० ०

मज दर्शन घडलें, घडलें !
खुदाचें रुप मूर्त भेटलें ! ॥ धृ. ॥

कल्याण खजीन्यानिशीं
मी लुटलें गेलें कशी ?
मम रूपाच्या खजिन्यावरती संकट ओढवलें !

तूं नयनिं नयन रोखिले
तव मानस आनंदलें
' असतिस आओ - - काय रूप मम ? ' वदतां तूं हरखलें !

काकणें, चोळि देअुनी
केलीस भाअि पाठवणी
यवन बोलती ' काफर ' तुजला - - झूट ! अतां पटलें !

शिवप्रभू तुझी थोरवी
या भूमितलां गौरवी
भाग्य केवढें पावित्र्याचें लेणें मज लाभलें !

१९–१–६० :

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 37497 वि: 3107
क्रमांक 7433 नों: दि: 74171

# : भूषणें दूषण आम्हांस :

( **कथासूत्र –** अेकदां शिवाजी महाराजांनीं तुकारामाकडे बहुमोल असा नजराणा पाठविला होता. तुकारामानें तो विरक्त भावनेनें परत पाठविला. तुकाराम राजांना आपली भूमिका सांगत आहे-- )

० ० ०

शिवा मी विठाअिचा दास
नको मज दौलतिचा फांस ! ॥ धृ ॥

भूषणें वस्त्रें अन् संपदा
धाडिशी नाना या आपदा
विराग्या उरली ना आस.

तुझा हा अुंची नजराणा
मला मुळि डोळा बघवेना
नसे हा लक्ष्मी-अुपहास.

विषाची नको अिथें पेरणी
तुक्याची सुपीक ना धरणी
भूषणें दूषण आम्हांस!

विठूचें गाअुं कसें नाम
अम्हांला तेंच परंधाम
रंजल्या धन दे संतोष !

१९-१-६०:

# ० दिले भोग जे ते भोगावे ०

( **कथासूत्र**– संत नामदेव पूर्वी लुटारू होते अशी आख्यायिका आहे. त्यांनीं ज्या राउताला ठार मारलें होतें, त्याची विधवा पत्नि आपल्या भुकेलेल्या पोरास म्हणाली 'तुला आतां काय वाढूं ?' तिचा आकान्त ऐकून नामदेवाचें अंतःकरण कालवलें !' शिवालयाच्या पायरीवर त्यानें डोकें बडवून घेतलें व देवास रक्ताचें अर्घ्यदान केलें. )

० ० ०

मस्तक फुटलें रुधिर झरू दे
देवा तुजला अर्घ्य वाहुं दे ! ।।धृ।।

कट्यारिनें ह्या राउत वधिला
पोर तयाचा अुघडा पडला
दीन दशा ती पाहुन देवा . . वाटें माझा अंत होअुं दे !

वितभर पोटासाठीं केली
दुष्कर्में; जीवनें जाळिलीं
त्या पापांच्या तीव्र धगीनें . . ह्या पाप्याला जळुनि जाअुं दे!

जें पेरावें तें उगवावें
दिले भोग जे ते भोगावे
नको दया ती पश्चातापें . . पापी नाम्या खाक होअुं दे!

१९-१-६०:

# जोडशील तूं प्रभुचरणां !

( **कथासूत्र–** संत एकनाथ जनार्दन स्वामीकडे शिष्य म्हणून गेले असतांना त्यांची कसोटी पाहण्यासाठीं जमाखर्चांतील एक टक्क्याची चूक शोधून काढण्याची कामगिरी त्यांना सांगण्यांत आली. सबंध रात्रभर अेकनाथ जागले पण चूक सांपडली नाहीं. सतत दीर्घोद्योगाच्या कसोटींत अेकनाथ अुत्तीर्ण झाले व त्यांना गुरुपदेश मिळाला, त्यावेळीं जी स्थिति झाली ती त्यांच्या मुखानें– )

-o- -:- –o–

निशा निवळली . . . झोंप न नयनां
टक्याची चुकी सांपडेना ! ! ।। धृ. ।।

जमाखर्च ताळाच जमेना
आकडयांचा मेळ बसेना
पानांमागुन अुलटुन पानें . . . प्रयत्न केला पुनः पुनः

सत्याची ही असे परीक्षा
गुरुकृपेविण भाळि अुपेक्षा
शिष्य कसा मी होअूं आतां ? . . दुर्दैवें राहिलों अुणा!

गुरू जनार्दन येत पाठिशीं
म्हणती "वत्सा, सुशिष्य होशी–
दीर्घोद्योगी होअि कसोटी . . . जोडशील तूं प्रभुचरणां! "

१९-१-६०

## वनवासी पांखरूः-

(**कथासूत्र**–'नामयाची जनी' या अनाथ मुलीबद्दल पांडुरंगास किती कौतुक व काळजी वाटत होती हें सुप्रसिद्ध आहे. स्वतः पांडुरंग रुक्मिणीसहि कोडकौतुक करण्यास सांगत आहेत.)

० ० ०

जनी तर वनवासी पांखरू
राति‍चं विसाव्यास आलं
रुक्मिणी ऊठ ऊठ बाओ
जरासं दार करी किल्किलं !
जनीला आओ ना बाप
जनीला बहीण ना भाऊ
रुक्मिणी ऊठ ऊठ बाओ
जनीला घालू या न्हाऊ !
जनीचं दळण मी दळितों
जनीचं कांडण मी कांडितों
रुक्मिणी घाल तिची वेणी
कपाळीं टिळा मीच लावितों !
जनी ग वनवासी पांखरू
गोडधड कर कांहीं लौकरीं
रुक्मिणी नेसवि ग तिजला
भरजरी चोळी आणि चिरी !

१९-१-६० :

# सोनुल्या थरथरते धरणी !

( **कथासूत्र**–आईबाप तहानेनें व्याकुळ झाले म्हणून श्रावण झारी घेऊन पाणी आणावयास जातो. दशरथाच्या बाणानें तो मारला जातो. पाठीमागें आईबापांच्या मनांत अनेक शंका येतात; व अनेक भास होतात. ते त्यांच्याच शब्दांत असे– )

० ० ०

श्वापदें फिरती रानीं, वनीं
श्रावणा, येशि न कां अजुनी ? ।। धृ ।।
'आजि ग ! तात !' हाक भासुनी
जिवाचें हो पाणी पाणी !
प्राण तर गोळा हो लोचनीं !

लागली तृष्णा रे म्हणुनी
धांवशी झारिला घेउनी
घसरला पाय काय चुकुनी ?

आंधळे दोन जीव काय–
शोधतिल माय पितर हाय– ?
त्यांतुनी अंधारी रजनी !

श्रावणा, बाळा रे श्रावणा ऽ
लागल्या कळा किती प्राणां
सोनुल्या थरथरते धरणीं !

२०–१–६०:

# विचारी करी कधीं अविचार ?

( **कथासूत्र–** 'संन्याशाचीं पोरें !' इत्यादि अपशब्द अैकून श्री ज्ञानेश्वर अेकदां खोलीचें दार लावून रुसून बसले. त्यावेळीं त्याची बहीण मुक्ताबाई वयानें लहान असूनहि ज्ञानेश्वरास अुपदेश करीत आहे.)

० ० ०

कुणावर रुसशी ज्ञानेश्वर ?
खोलिचें अुघड अुघड दार ! ॥ धृ ॥

जगीं या संत जयें व्हावें
तयें जगबोलां सोसावें
करावें वज्रासम अन्तर !

अज्ञजन निंदावच बोलती
योगि का करितो त्याची क्षिति ;
विचारी करी कधीं अविचार ?

मनानें योगी रे पावन
करी तो रागांचें हवन
कशी तुज मीं शिकवूं पोर ?

योगि तर शांतीचा सागर
भ्रांतिचें पटल करी दूर
विनवितें मुक्ताअी सादर !

२१-१-६० :

# कढईला हींव आलें !

( **कथासूत्र**–भक्त प्रल्हाद हा नारायणाचा भक्त. त्याच्या पित्यानें–हिरण्यकश्यपूनें त्याचा नाना प्रकारें छळ केला. परंतु त्याचा 'नारायण–' जप थांबला नाहीं. नारायण सर्वत्र भरलेला आहे असें प्रल्हाद आपल्या पित्यास सांगतो.)

-०- -:- -०-

कडेलोट झाला तरी मला नारायण झेले
अकळत्या कढईला हींव भरूनीया आलें ! ॥ धृ. ॥

अुगवतां नारायण मावळतां नारायण
सर्वकाळीं नारायण 'नारायण' मुख बोलें !

ध्यास माझा नारायण श्वास माझा नारायण
घोष माझा नारायण 'नारायण' मुख बोलें !

जळीं स्थळीं नारायण सर्वभूतीं नारायण
बोलविता चालविता 'नारायण' मुख बोलें !

जन्म माझा नारायण मृत्यु माझा नारायण
रोधिलेंस किती जरी 'नारायण' मुख बोलें !

२१–१–६०:

# शकुंतलेला पिसें लागलें!

(**कथासूत्र–** शकुंतला आपली मदनबाधा कमळपाकळीवर रेखीत असतांना तिची अेक मैत्रीण दुसरीस शकुंतलेची अवस्था कथन करीत आहे; ती अशी–)

० ० ०

पत्र–लेखनीं भान हरपलें
शकुंतलेला पिसें लागलें ! ॥ धृ. ॥

कमल–पाकळीवरी रेखिलें
लाल गुलाबी भाव रंगलें
नयनिं शराबी स्वप्न नाचलें !

रेशिमहातीं आली थरथर
झाली वेडी ... झाली कातर
क्षणांत कळिचें रूप विकसलें !

प्रियंवदे गे बघ ही त्रेधा
मदनाची गे ही तर बाधा
घडूं नये तें घडूं लागलें !

ही तर बाई सखी आपुली
दुष्यंतानें काल निरखिली
तयेंच असलें वेड लाविलें !

२२–१–६० :

# फसलें मी भोळी !

(**कथासूत्र**–दुष्यंतानें शकुंतलेची वंचना केली. 'घेऊन जाईन' असें तिला त्यानें वचन दिलें होतें; पण तो आलाच नाहीं ! त्यावेळीं तिच्या मनास झालेल्या यातना येथें तिच्या मुखानें सांगितल्या आहेत.)

० ० ०

याच तरुतळीं तुझी नि माझी प्रीत फळा आली
'घेअुन जाअिन !' अशी नृपवरा केलिस कां बोली ? ॥ धृ. ॥

कशाला पोर फशीं पाडिली ?
वंचनीं दु:खें कां वेढिली ?
फुलें वाहिलीं पदीं चिरडिलीं–नयने ओलावली !

आश्रमीं गुपित प्रगट झालें
जाहलें मेल्याहुन मेलें
शपथ घेतली कशी विसरली ? ... हृदयिं जळे होळी !

नृपाळा, पाहुं किती वाट
भाळिरे दु:खाचें ताट
आश्रमवासीं, आश्रित, पामर– – फसलें मी भोळी !

२२–१–६०:

# दुधाची शपथ मनीं आण

(**कथासूत्र**–सत्वाची चांगुणा सत्वाला जागली. अतिथीच्या वेषानें प्रत्यक्ष परमेश्वरांनें तिच्या चिलिया बाळाच्या मांसाचें अिच्छाभोजन मागितलें. तिनें त्या प्रमाणें सिद्धता केल्यावर 'बाळाला भोजनास बोलव' अशी त्यानें तिला आज्ञा केली ! त्यावेळीं ती त्याला बोलावीत आहे. )

० ० ०

मारिते हाक तुला चांगुणा
चिलिया, ये बाळा भोजना ! ॥ धृ. ॥
कोंवळी काया पुष्पापरी
चिरियली भाजीसम विळिवरी
रांधिलें चुलिवर तुज प्राणा !
कांडिलें अुखळिं तुझें शीर
टाकुनी आअीचें अूर
भोजना यावें यति–कामना !
जन्मदा झाली रे वैरिण
दुधाची शपथ मनीं आण
तिष्ठती यती अिथें मोहना !
येइ रे नाचत ताटावरी
सत्व मम हाकारी निकरीं
येतसे ! हांसत ग चिमणा ! !

२३-१-६०:

# अंतिचें हृदयाशीं घेअी !

(**कथासूत्र**—स्वतःचा अेकुलता अेक पुत्र, युवराजाचा प्राण वांचावा म्हणून, मृत्युमुखीं देणाऱ्या स्वामिभक्त पन्नादाईची ही कथा ! )

० ० ०

पाहिली अशी कुणी आअी
पाडसा मृत्युमुखीं देअी ! ॥ धृ. ॥

धन्य ती स्वामिभक्त पन्ना
वांचवी राजपुत्रप्राणां
अमर ती राजपुती दाअी !

मंचकीं ठेवियलें लेकरू
नभींचा ढग लागे पाझरूं
अंतिचें हृदयाशीं घेअी !

टोपलित राजतनय ठेविला
लगबगीं तृणपर्णें झाकिला
घेअुनी सेवक शिरिं जाअी !

तनय तो राजतनय समजुनी
शत्रुनें टाकियला विंधुनी
रडाया वेळ तिला नाहीं !

२३-१-६० :

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ..........
शाखा स्थळ प्रत

# पंजरीं सांपडली हरणी !

( **कथासूत्र**–तान्हया बाळाला घरीं ठेवून हिरकणी गडावर आलेली असते. नियमाप्रमाणें रात्रीं तोफ होऊन दरवाजे बंद होतात व ती आंत अडकली जाते ! मुलाच्या ओढीनें दार उघडण्यासाठीं तिनें रखवालदारास खूप विनविलें पण व्यर्थ ! तिनें बुरुजावरून खालीं उडी घेतली पण परमेश्वरकृपेनें ती जाळीवर पडली व वांचली. तिच्या धारिष्टयाची व पुत्रप्रेमाची वार्ता अैकून शिवाजी महाराजानीं तिचा गौरव केला व त्या बुरुजाला तिचें नांव दिलें.)

-०- -:- -०-

अडकली गडावरी हिरकणी
पंजरीं सांपडली हरणी ॥ धृ. ॥

गडाची तोफ झणीं वाजली
दिंडिचीं दारें अन् झाकलीं
अेकली ! रात्र चरकली मनीं !

अेकटें घरामधें तान्हुलें
रक्षका परोपरी विनविलें
नृपाज्ञा जाइ कशी भंगुनी ?

जाअुनी बुरुजावर हिरकणी
स्वत:ला दे खालीं झोंकुनी
वांचली वेलीवर जननी !

" धन्य ती पुत्राची माता
धन्य ती ममता अन् धीरता "
शिव:प्रभु गौरवीत भाषणीं !

२५–१–६० :

# फुलांवांचुनी सुगन्ध सुटला !

० ० ०

कोण अचानक येई शरिरीं करावयास शिकार ?
मन करी कळ्यांकळ्यांत विहार ! ॥ धृ. ॥

फुलांवांचुनी सुगन्ध सुटला
हृदयाम्राला मोहर फुटला
वसंत–वैभव बहरुन आलें ... खिदळत ये शृंगार !

पवन लहरला नसानसांतुन
यौवन हांसें तृणपर्णांतुन
‘ कुहूकुहू ’च्या गीत–निनादीं हृदयाचा हुंकार !

नील नभाला नजर लागते
मधुर तिथें तर कोण हांसतें
लाजलाजतें मनोमनीं मी स्वप्न गमें साकार !

अवखळ बाई कोण अनावर
स्वर्ग पाहतें असुनी भूवर
चंद्रकरांतिल शीतल जादू फुलवी हृदिं अंगार !

२५–१–६०

# मनांत झुरते अेक चांदणी !

० ० ०

मनांत झुरते अेक चांदणी
ओढ लाविते लुकलुक करुनी ! ॥ धृ. ॥

लुकलुक–ज्योत्स्ना करी अवाहन
रोमांचांनीं फुलतो कणकण
घालितसें कीं काय मागणी ?

वास तियेचा नील नभांत
मी तर फत्तर भू–लोकांत
खुणावुनी पसरिते मोहिनी !

तिला न कळली ... मला न कळली
वाट प्रातिची अवघड असली
सुदूर जडली कशी शिराणी ?

२७–१–६०

# दोष असे मम अस्तित्वाचा !

(**कथासूत्र–** रजपूत राजकन्या कृष्णाकुमारी हिच्या अप्रतीम लावण्यामुळें अनेकांत स्पर्धा वाढून तिच्या बापास अनेक शत्रु निर्माण झाले. यांतून सुटका म्हणून तिला ठार मारण्यासाठीं राजानें आपल्या दासीपुत्रास आज्ञा केली. तिचा निष्पाप चेहरा पाहून त्या दासीपुत्राचा खंजीर हातांतून खालीं गळून पडला. त्याला उद्देशून कृष्णाकुमारी म्हणते–)

-०- -:- -०-

राजपुती सौंदर्यवतीचा
जन्मासंगें मृत्यु मुलीचा ! ।। धृ. ।।

वैराचें काहूर माजलें
किती जणांचे मुडदे पडले
दोष असे मम अस्तित्वाचा !

हवन चाललें हें थांबावें
सूडाग्नीचें सत्र सरावें
लोभ कशाला धरूं कुडीचा ?

पिता संकटीं ! काय तयाहुन–
मोल जिवाचें? ‘ सकल समर्पण ’–
लेख ललाटीं असे विधीचा !

पूस बांधवा, घाम भाळिचा
थांबव थांबव कंप कराचा
गळला खंजिर मारायाचा !!

२८-१-६०

# प्रीतिला नसे जातपात !

(**कथासूत्र**–देवयानी ही शुक्राचार्यांची मुलगी आणि शुक्राचार्य हा असुरांचा गुरु. देवयानीचें प्रेम कचावर बसलें हें शुक्राचार्यास पसंत पडलें नाहीं. जेव्हां शुक्राचार्य हट्टास पेटतात तेव्हां देवयानी त्याना म्हणते–)

° ° °

प्रीतिला प्रींती गणगोत
प्रीतिला नसे जातपात ! ॥ धृ.॥

कच जरी वैऱ्याचा कुमर
मज गमें प्रीतीचा सागर
कपट ना त्याच्या हृदयांत !

प्रींतिचा केला मीच गुन्हा
दोष का द्यावा त्यांना पुनः ?
लेकिचा करी कुणी घात ?

तात द्या त्यांना संजिवनी
झुरतसे देवयानि निशिदिनीं
शिष्य तर जावइ गुणवंत !

२७-१-६०

# धांवत ये लौकरी !

( **कथासूत्र–** स्वत:चे पांच पति समोर असतांना दु:शासन द्रौपदीची विटंबना करतो. असहाय्य अवस्थेंत तिनें कृष्णाशिवाय कुणाचा धांवा करावयाचा ? कृष्ण हाच तिचा पाठीराखा होता. व त्याचाच ती धांवा करीत आहे. )

° ° °

हा धरुनि ओढितो निरी
धांव रे धांव सख्या श्रीहरी ! ॥ धृ. ॥

हे समोर पति अथिरथी
हतवीर्य गमत संप्रती
गुरुजनांस नाहीं धृती ऽ
असे मुकी वैखरी !

दु:शासन पापी खलें
डोइचे केस ओढिले
फरफरा पदर ओढुनी ऽ
विटंबितां रे अरी !

मम लाज पणा लागली
ही तुजला का आवडली ?
लज्जारक्षण कशीं करूं मी ?
धांवत ये लौकरी !

२८–१–६०

# ही कठोर अमुची कुडी !

(**कथासूत्र**–श्रावणाच्या मृत्यूची बातमी दशरथाच्या मुखानें अैकल्यावर त्याच्या अंध आईबापानें जो आकान्त केला तो–)

° ° °

श्रावणा ऽ थांब श्रावणा !
तुजविना जन्म रे अुणा ! ।। धृ ।।
तव कोमल कायेवर
दशरथें सोडितां शर
'हे माय, तात !' क्रंदनीं ऽ
मृत्यूस न ये करुणा !

लागतां तृषा निष्ठुरा
तूं तळमळशीं अंतरां
अन् तृषार्थ जल आणितां ऽ
तव अंत घडे जीवना !

तूं कावडवाला जिथें
हे आत्मे येतिल तिथें
ही कठोर अमुची कुडी ऽ
घायाळ जिवां सोडिना !

२८–१–६० :

# रातच ही प्रणयाची

° ° °

सखी ग ! रातच हीं प्रणयाची ! ।। धृ. ।।

मधु–चंद्राचें मधुर चांदणें
खुलवी गालावरी गोंदणें
हंसलें ओठीं तुझ्या लाजणें
हंसली दौलत मम हृदयाची !

लहरत आले वारे गहिरे
पुलकित झालीं भावपांखरें
तनु रोमांचित तुझी सुंदरे !
थरथरली बघ ज्वानी अुरिची !

तूं माझ्या हृदयाची राणी
ये करपाशीं गाऊं गाणीं
संपवुं रजनी गाढ मीलनीं
बावरशी कां ? भीति कशाची ?

२०–८–५१

# ध्यास तुझा रे लागला सदां

( **कथासूत्र–** राधा-कृष्ण यांचें प्रेम अलौकिक प्रकारचें होतें. कृष्णाच्या भेटीसाठीं ती किती वेडी झाली आहे पहा.)

-०- -:- -०-

नयनिं न येई   नीज मुकुंदा
ध्यास तुझा रे   लागला सदां ! ॥ धृ. ॥

हृदयांतिल कुजबुजतीं भावपांखरें
व्याकुळलीं विरहानें कृष्णसख्या रे
व्यथित जिवाच्या   जाण आपदां !

क्षण येथें, क्षण तेथें खेळ पुरे रे
राधेच्या हृदयांतिल भाव फुलव रे
विनति राजसा   करुं कितीकदां ?

भक्तीची पाहुं नको क्रूर कसोटी
वाहिन रे प्राणसुमन हीच सचोटी
कृष्णकन्हैया   दाखवी पदां !

२१-८-५१

# येवो न ऐसें अपुल्या मनीं

(**कथासूत्र–** अर्जुनाच्या अनेक बायकांपैकीं चित्रांगदा ही एक होय. ठरलेल्या अटीप्रमाणें तीन वर्षानंतर अर्जुन तिला व पुत्रास सोडून निघाला असतांना तिच्या मनाची झालेली स्थिति)

° ° °

हे चंद्रम्या ऽ मी रोहिणी
चंद्राविना हो हतभागिनी ! ॥ धृ. ॥

ताटातुटीच्या क्षणीं अर्जुना
बाळास घ्यावें मुख चुंबावें
बोला तयाशीं मधु–भाषणीं !

चित्रांगदा कामिनी विनवितें
जातां तरी या परतून राया
राहूं कशी मी पतिवांचुनी ?

जातां ळळा लावुनी राजसा
परतून नाहीं येणें कधींही–
येवो न ऐसें आपल्या मनीं !

३०–१–६०

# नको रे ओढूं अंतपुरीं !

(**कथासूत्र**–विराट नगरींत द्रौपदी 'सैरिंध्रि' म्हणून वावरत होती. विराटराणीनें तिला कीचकास मदिरा देण्यासाठीं पाठविलें. त्यानें पापी वासनेनें तिच्याशीं लगट करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां ती त्याला व्याकुळतेनें म्हणते)

० ० ०

कीचका, गोष्ट नव्हे ही बरी
नको रे ओढू अंतःपुरीं ! ॥ धृ. ॥

सैरिंध्रि अबल मी जरी
गंधर्व–छत्र मजवरी
तयाची दासि न मी अस्तुरी !

मी शूरांची अंगना
आवरी विषय–वासना
खलाची दशा मृत्तिकेपरी !

ही लगट तुझी अग्निशीं
विषयान्धा नच जाणशी
मंचकीं जाशिल सरणावरी !

१-२-६०

अनुक्रम ३१... वि: ...गाणी
क्रमांक ...२५३३...... नों: दि: ...२५/११/

# सौंदर्याला शाप विधीचा

(**कथासूत्र**–द्रौपदीची सर्व जन्मभर सतत विटंबना होत गेली. किंबहुना दु:ख भोगण्यासाठींच ती जन्मली होती. अन्नूवर अनेकदां घाला आला. याला कारणीभूत असलेल्या सौंदर्याबद्दल ती म्हणते–)

० ० ०

नाच सरेना दुर्दैवाचा
सौंदर्याला शाप विधीचा ! ॥ धृ. ॥

यज्ञसुता मी पांच पतींची
जोड लाभुनी पराक्रमाची
भोग सरेना पांचाळीचा !

अश्वथामा दु:शासन तो
पापि वासना कीचक धरतो
खेळ चालला मम लाजेचा !

कशास देवा देतां असलें
रूप मनोहर मोहरलेलें ?
व्याकुळ होतो जीव सतीचा.

१-२-६०

# कळलें कुंती माझी माता !

(**कथासूत्र–**"पांडव हे तुझे भाऊ व कुंती आई" असें कृष्णानें कर्णास सांगितल्यावर त्याला अतिशय दुःख झालें, पश्चात्ताप झाला; पण विश्वासघात करणें बरें नव्हें म्हणून तो कौरवाशीं प्रामाणिक राहिला. कर्तव्य, कारुण्य, पश्चात्ताप यांच्यांत तो सांपडला आहे. कृष्णाला तो म्हणतो--)

० ० ०

उशीर झाला कळलें आतां
कळलें कुंती माझी माता ।। धृ ।।

पांडव माझे भ्राते असुनी
छळिली पांचाली मी वहिनी
पश्चात्तापें अुरांत फुटतों मी रे यदुनाथा !

सांगु नको हें युधिष्ठिराला
देउन टाकिल राज्यच मजला
मिळेल मग तें कौरवपुत्रां बसेल कीं गोता !

पार्थासह मी लढतां लढतां
मरण वांछितों पांडवनाथा
कौरवपक्षा शब्द वाहिला न करी मी घातां !

१-२-६०

# बरें त्याहुनी पतन आमुचें

( **कथासूत्र–** कौरव पांडव युद्धास ठाकलें असतांना अर्जुनाच्या मनांत संभ्रम निर्माण झाला . . . 'युद्धांत आपला अंत झाला तरी चालेल पण आप्तजन, गुरुजन यांच्यावर शस्त्र कसें चालवावयाचें ?' असें तो कृष्णास सांगतो.)

० ० ०

कसें आप्तजन वधावयाचें ?
नकोच कृष्णा राज्य धरेचें ? ॥ धृ.॥

शिथिल जाहलीं गात्रें सारीं
शिरें कापरें माझ्या शरिरीं
गळूं लागलें धनुष्य करिंचें

तीर्थस्वरुपी गुरूजनांवर
कृतघ्न होउन सोडूं कां शर ?
चळतें वारें पराक्रमांचें !

कौरव–भ्राते समरीं मारुन
कुल:क्षया कां होऊं कारण ?
बरें त्याहुनी पतन आमुचें !

३०–२–६०

# धर्म जाणुनी कर्म करावें

(**कथासूत्र–** ‘कर्तव्यपराङ्मुख होणें या सारखे पाप नाहीं’ असे कृष्ण अर्जुनास सांगतो व त्यास लढाईस प्रवृत्त करतो.)

-०- -:- -०-

कर्तव्याला जो जगिं चुकला
मोक्ष–पदालाही तो मुकला ! ॥ धृ. ॥

पांचाळीची होतां दैना
कशास केल्या वृथा वल्गना ?
क्षत्रियबाणा कां रे चळला ?

जो जो प्राणी जन्मा आला
चुकलें नाहीं मरण तयाला
नकोस होऊं भेकड दुबळा !

संमोहाचें पटल त्यजावें
धर्म जाणुनी कर्म करावें
शस्त्र करीं घे अचल पावलां

३-२-६०

# गोरीमोरी गौळण राधा

० ० ०

(**कथासूत्र**–सामान्य लोकांना राधा–कृष्ण-प्रेमाची कल्पना नव्हती. कृष्णाचा सवंगडी पेंद्या कृष्णाला राधेची वेडी अवस्था सांगतो; ती अशी–)

गोरीमोरी गौळण राधा
होते कां रे सांग मुकुंदा ? ॥ धृ. ॥

नयन लावुनी नील नभाला
काय शोधिते ही घननीला ?
पुसतां तिजला 'कसली बाधा' ?

चुलीवरी ही दही ठेविते
दूध रवीविण घुसळत बसते
सासू पुसतां 'कसला धंदा' ?

वाजवितां मी तुझी बासरी
धांवत येते नदी–किनारीं
मला पहातां उडते त्रेधा !
भूत लागलें 'काळें' हिजला
'देणें' द्यावें काय तयाला ?
सांग सावळ्या तूं तर सोदा !

४-२-६०

# तीर्थवाणी गांव

०　　　　०　　　　०

नाविका ! वल्हव, वल्हव नाव !
दिसू लागले तीर्थवाणी माहेराचे गांव ! ॥धृ.॥

संसारीं मी गुंतुनि जातां
विसरुन गेलें पिता नि माता
मायेसाठीं इथेंच असते खुळया मनाची धांव !

जन्म लेकिचा बापुडवाणा
ताटातुटिच्या किती यातना
गंगा यमुना उसळुन येतां नुरे जिवाला ठाव !

भातुकली ती खेळणपाणी
खेळाया नच अतां सजणी
मायपित्याच्या दृष्टिसुखांतिल भेटीची परि हाव

५-२-६०

# आजला येशिल का घरधनी ?

-०-  -:-  -०-

डाव्या डोळयाची सारखी फुरफुरते पापणी
हृदयाच्या माझ्या आजला येशिल का घरधनी? ॥धृ.॥

तुझ्या चिंतनीं  तनु आसुसली
पाल अचानक  अन् चुकचुकली
सोन्याची वाचा मंगला दाविल का सुखखनी ?

मिटल्या नयनीं  तुझीच प्रतिमा
मिटल्या नयनीं  हंसे पौर्णिमा
प्रीतिगीत गाई अंबरीं चंद्रासह रोहिणी !

मिटलीं कमलें  ये फुलवाया
अनुरागाची प्रभा लुटाया
अंत किती बघसी जिवाला लावुं नको ओढणी!

"वसुन्धरा" मधून

# तुझीच बघतें वाट !

° ° °

अिथें मी तुझीच बघतें वाट !
भेटीसाठीं तुझ्या राजसा, चढल्यें अवघड घाट ! ॥धृ.॥

ओढ लागली तुझी अनावर
वेड लाविते तुझीच हुरहुर
आल्यें येथें ठेवुन सखया नदीकिनारीं माठ !

मी तर भोळी मुग्ध किशोरी
तव विरहाचे बाण जिव्हारीं
व्याकुळ झाल्यें धांवत आल्यें नाहीं केला थाट !

करपाशीं तव अिथेंच रमल्यें
तव अधरींचें अमृत प्यालें
अुधळुन लावूं नकोस माझीं स्वप्नें वाटोवाट !

“ वसुन्धरा ” मधून

# तुझ्या मनींचा गोड गोडवा

० ० ०

तुझ्या मनींचा गोड गोडवा
आणिल का मम हृदीं पाडवा ? ॥ धृ. ॥

सौजन्याची मूर्त शालिनी
ओठीं स्रवते अमृतवाणी
लोभस भाषा तुझी रागिणी–
ओढ लाविते जिवा !

ईप्सित लपलें गूढ त्वन्मनीं
असळुन आलें तुझिया नयनीं
खटयाळ भारी तुझी पापणी–
वेड लाविते जिवा !

व्यक्त ठेविशी अव्यक्तांत
लपंडाव का प्रत्यक्षांत ?
अदय, सदय का असली रीत–
तात लागते जिवा !

" वसुन्धरा " मधून

# येई सखे गात गात

० ० ०

लाविलेंस वेड सखे   घेतलेस करपाशीं
मीलनांत प्रीत कळे   हृदयाची हृदयाशीं ॥ धृ. ॥

नवरस सुमनांचा   सुखवाया ये सुगन्ध
थाटमाट साज तुझा   बघतां मी होय धुंद !

सहवासीं येइ तुझ्या   कल्पवृक्ष फळांफुलां
अभिलाषा काय धरूं ?   तुझ्या विना व्यर्थ कला !

मोहिलेंस भाळिलेंस   प्रणय-पांखरा सदां
नेत्रांतिल गे तुझिया   जादुगिरी करी फिदा !

वितरित ये आनंदा   ये हांसत, ये नाचत
झंकारित मधु–वीणा   येइ सखे गात गात !

"वसुन्धरा" मधून

# केली कैसी तुम्ही वांकडी वाट ?

० ० ०

अशी अचानक केली कैशी तुम्ही वांकडी वाट? ॥ धृ. ॥

वसंतांतलें वैभव–लेणें
विशीर्ण केलें या शिशिरानें
वावटळीनें पर्णसुमांची झाली वाताहात !

तुमच्यासाठीं पुष्पें फुलली
वाट पाहुनी दमलीं सुकलीं
घमघमाट अन् सौगंधाचा विरला अवकाशांत !

वर्षाकालीं आस धरावी
सभोवतीं पण वृष्टी व्हावी
अिथें मुळीं नच पाअुल वळलें अपुलें किति सालांत !

" वसुन्धरा " मधून

# पर्वलीचा शब्द

० ० ०

नका कुणी रोधूं मजला  सांगतें तुम्हांला
  पर्वलीचा शब्द सखिनो  कानि आला, आला ! ॥ धृ. ॥

किती रात्रि जागुन गेल्या  पहाण्यांत वाट
झोंप नाहिं माहित नयनां  नाहिं गांठभेट !
  जीव झुरे त्याच्यासाठीं  ओढ मन्मनाला !

चंद्रतेज हृदयीं आलें  निशा दूर झाली
खुदूं खुदूं हांसत माझे  भाव मखमाली
  मंदवात झाला धुंद  आणि सुगंधाला !

पुरे पुरे थट्टा आतां  ताणूं नका तार
व्याकुळला कोमल ऊर  झालें मी बेजार
  अशा कशा निष्ठुर होता  याच सुमाराला ?

" वसुन्धरा " मधून

...दी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३१५४२ विः आत्म
क्रमांक १५३३ नों दिः २५।७१

# धुंदच गोडी प्रीत-सुधेची

-०- -:- -०-

पुनव नव्याची पुनव नव्याची
मंथरलेली नवलाईची ! ॥ धृ. ॥

मी तू दोघे रात आपुली
स्वप्नपांखरें बिलगुन बसलीं
नवीच सोबत नाविन्याची !
चंद्र हांसला फुलें चांदणें
मिठींत तुझिया अनंगगाणें
उरांत मैफल रोमांचांची !
धुंद निशा ही धुंदच मीलन
विसरुन गेलों माझें मीपण
धुंदच गोडी प्रीत–सुधेची !

१३–२–६०

# तुझा माझा सूर आतां

० ० ०

तुझा माझा सूर आतां
अेक झाला ऽ अेक झाला ! ॥ धृ.॥

तार तुटली जोडिली तूं
वाट फुटली मिळविली तूं
भेट होतां, संगिताला रंग आला ऽ रंग आला !

स्वप्न होतें जें मनाशीं
आज येतां प्रत्ययाशीं
हृदयिं मांझ्या कल्पवृक्षा बहर आला ऽ बहर आला

" ब्रह्मगांठ " नाटकांतून

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 19284
REFBK-0011245
REFBK-0011245

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 31575 दि: 3/07
क्रमांक 9533 नों: दि: 24/7/

# 'सुगन्ध-वारा' खण्डकाव्य ( १९५४ )

(प्रस्तावना–डॉ. वि. म. कुलकर्णी अेम्. ए. पी.एच्. डी.)

**( निवडक अभिप्राय )**

( १ ) मराठी काव्यक्षेत्रांतील अेक उदयोन्मुख कवि प्रताप, यांचें 'सुगन्धवारा' हें प्रदीर्घ खंडकाव्य म्हणजे अेक प्रेमकथा आहे. ही प्रेमकथा रंगवितांना कवीनीं सद्अभिरुचि न सोडतां दोन मुग्ध मनांतील भावनांचे जे हेलकावे दाखविले आहेत ते स्पृहणीय आहेत. या खंडकाव्यांत वर्णन केलेले प्रसंग काल्पनिक आहेत, तरीहि मधुर शब्दयोजना व सुबोध रचना यामुळें यांत जिवंतपणा आढळतो.

मराठींत अलिकडे नवकाव्याचें खूळ पिकलें आहे. मुक्त छंदांतील स्वैरता धुमाकूळ घालीत आहे. चारदोन ओळींच्या कविता लिहून कांहींनीं चिरंजीव कवि असल्याचा आभास निर्माण केला आहे. अशा वेळीं श्री. प्रताप यांनीं ही दीर्घ काव्यकथा मरठी वाचकांना सादर केली आहे हें उल्लेखनीय आहे. यांत आंतरजातीय प्रीतिविवाहाचा केलेला पुरस्कार विचारार्ह आहे.

— 'पुढारी' कोल्हापूर

( २ ) आजकाल खंडकाव्याची निर्मिति मराठींत क्वचित्‌च होते. त्यांतूनहि कवि प्रताप या नवोदित कवीनें स्फुट काव्याआधीं प्रदीर्घ कविता प्रसिद्ध करावी हें धाडस आहे. ते या प्रांतांत नवे असले तरी काव्याची रचना सफाईदार वठली असून कवीची कल्पनाशक्तीहि मार्मिक असल्याचा दाखला मिळतो.

— लोकसत्ता, मुंबई

( ३ ) तुमची व सूर्यकान्तांची कविता मला मनापासून आवडते व ती मी मनापासून वाचतों. तुम्ही अशी सकस कविता लिहितांना पाहिलें, कीं मराठी कवितेच्या उज्ज्वल यशाबद्दल आनंद वाटतों. सातान्याचें वैशिष्ठ्य तुमच्या काव्यांतून प्रगट होवो अशी सदिच्छा प्रगट करतों.

— प्रा. शं. के. कानिटकर (गिरीश)

## 'वसुन्धरा' स्फुट कविता-संग्रह ( १९५८ )

### ( प्रस्तावना-कवि गिरीश )

( १ ) ' सुगन्ध-वाऱ्या ' नंतर कवि प्रताप 'वसुन्धरे' च्या निमित्तानें रसिकांना भेटत आहेत. ' सुगन्ध-वारा ' हें खंडकाव्य होतें तर 'वसुन्धरें'त त्यांनीं अलिकडील स्फुट कवितांचा समावेश केला आहे. निसर्गाच्या रम्य सहवासांत त्यांची काव्यवेल फुलते, बहरते. त्यांच्या प्रेमविषयक कवितांतून प्रेयसी, माता, भगिनी अशा विविध नात्यांतील प्रेमाचें चित्रण त्यांनीं केलेलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ' दैवत माझें माय माउली ' असें म्हणून ते वारंवार जननीची आठवण करतात. त्याचप्रमाणें जन्मभूमीची आठवणहि त्यांच्या मनांत ताजी राहते व तिचीं चित्रें ते हळुवार हातानें रेखाटतात.

माधवराव बागल, साने गुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादि व्यक्तिविषयीं आदर त्यांनीं कवितांतून व्यक्त केला आहे. ' रक्तपिपासु तुम्हासाठीं कां आत्महोम केला ? ' असा सवाल ते हुतात्म्यांच्या तोंडून स्वार्थी पुढाऱ्यांना करतात. व ' धनिकांच्या श्वानांना ' ' मालकासवें तुझ्या पडशिल तूंहि अुताणा ! ' असा अिशारा देतात. ' खिंडित गाठुन घ्यावी खंडणी, खिसे भरावे दोन्हींकडुनी, ' अुजेडांत पण साव दिसावें ' हें त्यांनीं ' मार गिन्ना ' मध्यें रेखाटलेलें चित्र आपणाला व्यवहारांत पदोपदीं दिसत नाहीं काय ? कोठल्याहि मताचा आग्रह न धरतां सत्य स्थितीचें चित्रण करणें ही प्रतापांची वृत्ति दिसते. अेकंदरित त्यांची ही ' वसुन्धरा ' बहुरत्नानि आहे हें रसिकांना मान्य होअील. त्यांची काव्यवेल यापेक्षांहि अधिक बहरेल, फुलेल अशी आशा करण्यास जागा आहे.

— मनोहर जुलै १९५९

याशिवाय श्री. गांगल (लोकसत्ता), श्री. रॉक कार्व्हालो (मराठा) प्रा. म. ना. अदवंत, जळगांव, श्री. श. रा. राणे, भालोद ( खानदेश ) श्री. रा. द. वाकणकर, बुधगांव आणि प. पू. स्वामी रामानंद भारती सांगली यांचे अभिप्राय लाभले आहेत.